## नियमीत दिवाणी दावा क्रं. २४८/२०१७ नि.क्रं. ७० खालील आदेश

वादी यांनी सदरचा दावा खरेदीपत्र रजिस्टर होऊन मिळणेसाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ११४ आणि आदेश ४७ नियम १ प्रमाणे नि.६६ वरील आदेशाचे पुनरावलोकन करणेत यावे यासाठी दाखल केला आहे.

०३. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनी नि.क्रं. ६६ चा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दरुस्तीसाठी दाखल केला होता. त्यामध्ये त्यांनी दावा टायटल क्लॉज मध्ये व दावा कलम २ मध्ये पाचव्या ओळीत करारपत्राची तारीख ही नजरचुकीने तसेच टायपिंग दोषामुळे १६ डिसेंबर २००३ ऐवजी १६ सप्टेंबर २००३ अशी पडली होती तशी दुरुस्ती करणेस परवानगी मागितली होती. सदरचा दावा हा दि.१६ डिसेंबर २००३ च्या खरेदीपत्रावरच आधारीत आहे. पुर्वीचे न्यायिक

अधिकारी यांनी नि.क्रं.६६ चा अर्ज अशंतः मंजूर केला असले कारणाने सदरचा दावा गुणदोषावर न्यायनिर्णीत होण्यासाठी सदरचा पुनरावलोकन अर्ज मंजूर करावा अशी विनंती वादी यांनी केली आहे. सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही व नामंजूर केलेस वादी यांचे कशानेही भरुन न येणारे असे नुकसान होणार आहे.

**०४.** वादी यांनी त्यांच्या कथना पृष्ठयर्थ मा. वरिष्ठ न्यायालयांचे खालील न्यायनिर्णय दाखल केले आहेत.

1. **M/s Vaid Organics and Chemical Industries Ltd.Lko. Through Its Directors Warn Singh Vs. State of U.P. Through Secretary Deptt. of Industries U.P.Civil Scrt. LkO and Others., Civil Misc. Regiew Application No. 41 of 2023.**

सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन करुन या अर्जाचे आदेशावेळी सदर न्यायनिर्णय विचारात घेतला आहे.

**०५.** प्रतिवादी यांनी त्यांचे लेखी म्हणेणे नि.क्रं.७३ वर दाखल केले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांचे सदर अर्जातील सर्व कथने चुकीची व लाबडीची असून ती प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही.

प्रतिवादी यांनी सदरचे तथाकथित खरेदीपत्र हे नाकारले आहे. वादी यांची सदरची चूक ही टायपिंग दोषामुळे झालेली नाही. त्यामुळे सदर दुरुस्तीच्या आधारे वादी दाव्यातील उणीवा भरुन काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे पुर्वीचे न्यायिक अधिकारी यांनी दिलेला नि.६६ वरील आदेश हा कायद्याला व वस्तुस्थितीला धरुन दिला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती वादी यांनी केली आहे. त्यामुळे त्यांना पुढेशी संधी देणे गरजेचे आहे.

**०६.** प्रतिवादी यांनी त्यांच्या कथना पृष्ठयर्थ मा. वरिष्ठ न्यायालयांचे खालील न्यायनिर्णय दाखल केले आहेत.

1. **<u>S.Madhusudhan Reddy Vs. V. Narayana Reddy and ors. Civil Appeal No.5503-04 of 2022 S.C.</u>**

सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन करुन या अर्जाचे आदेशावेळी सदर न्यायनिर्णय विचारात घेतला आहे.

**०७.** दोन्ही बाजूंच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दाखल कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी सदरचा दावा खरेदीपत्र रजिस्टर होऊन मिळणेसाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. नि.६६ चे अर्जाचे अवलोकन केले असता वादी यांनी

दाव्याच्या टायटलमध्ये व दावा कलम २ मध्ये तथाकथित खरेदीपत्राचे तारखेबाबत दुरुस्ती मागितली होती. माझे पुर्वधिकारी यांनी सदर अर्ज अशंतः मंजूर केला आहे. परंतु वादी यांचा सदरचा दावा हा दाव्यात नमुद तथाकथित खरेदीपत्रावरच अवलंबून आहे. तसेच सदचे खरेदीपत्र सिध्द करण्याची संपूर्ण जबाबदारी ही वादीवर आहे.

०८. वादीच्या पुनरावलोकन अर्जाप्रमाणे मागीतलेली दुरुस्ती करणेस परवानगी दिलेस प्रतिवादी यांना कोणत्याही नविन दावेस सामोरे जावे लागणार नाही अथवा दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच दाव्याची सत्य परिस्थिती न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. त्यामुळे तसे न केल्यास दाव्यात गुंतागुंत निर्माण होऊन दाव्याच्या न्यायनिर्णय देताना अडचण निर्माण होऊ शकते. त्यामुळे दाव्याच्या अंतिम निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याच्या दृष्टीने सदर अर्ज मंजूर करणे उचित होईल. त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश.**

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात आला.

२. अर्जात नमुद केलेल्या मजकुराच्या अनुषंगाने दुरुस्ती केवळ मंजुर करण्यात येते.

३. वादी यांनी दाव्यात तशी दुरुस्ती १४ दिवसात करावी.

Digitally signed by V. A. Lavand-Kokate
Date: 2024.01.19 11:10:06 +0530

V. A. Lavand-Kokate

दि.१८–०१–२०२४.
कळे–खेरीवडे.

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कळे–खेरीवडे.